**किरकोळ दि. अर्ज क्र. १७०/२०२२**
आभा व ईतर विरूध्द निरंक
CNR No. MHGO020011492022
निशानी क्र. १ खाली

**<u>निशानी १ वरील आदेश</u>**
**<u>(पारीत दिनांक १२ एप्रिल, २०२३)</u>**

अर्जदारांनी सदरचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळविण्याकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार यांचे थोडक्यात असे कथन आहे की, मयत मधुकर बळीराम मेश्राम यांची अर्जदार क्र. १ आभा दिलीप तिरपूडे व अर्जदार क्र. ३ विशाखा खेमराज नागदेवे ह्या मुली असून अर्जदार क्र. २ अमित मधुकर मेश्राम हा मुलगा आहे. मयत मधुकर बळीराम मेश्राम हे दि. २९/०४/२०१७ रोजी मयत झाले आहेत व मयताची पत्नी व अर्जदार यांची आई वत्सला मधुकर मेश्राम ही दिनांक २५/०५/१९९४ रोजी व मयताचा मुलगा व अर्जदार यांचा भाउ प्रसेनजित मधुकर मेश्राम हा अविवाहीत असतांना दिनांक ०३/११/२०२० रोजी मयत झाले असल्यामूळे अर्जदार क्र. १ ते ३ हेच मयत मधुकर बळीराम मेश्राम यांचे एकमेव वारस आहेत. त्यामूळे अर्जदार यांना मयताचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची गरज असल्याने त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्ज दाखल झाल्यानंतर अर्जदारांचे अर्जातील मागणीबाबत जाहिरनामा दिनांक ०५/०१/२०२३ रोजीचे दैनिक 'कशिश' वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आला व कोणाची काही हरकत असल्यास त्याबाबत हरकती मागविण्यात आल्या, परंतु अद्यापपावेतो अर्जदार यांचे अर्जातील मजकुराबाबत व मागणीबाबत कोणीही हरकत/आक्षेप घेतलेला नाही. अर्जदारतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

३. अर्जदारतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकुन व अभिलेखावरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सदर अर्जाचे न्यायनिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मागणीप्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ साठी :—**

४. अर्जातील कथनाचे पृष्ठ्यर्थ अर्जदार क्र. १ आभा दिलीप तिरपूडे यांनी निशानी क्र. १७ व निशानी १८ अन्वये त्यांचे पुराव्याची शपथपत्रे दाखल केली असून त्यांनी शपथेवर कथन केले आहे की, मयत मधुकर बळीराम मेश्राम यांची ती व अर्जदार क्र. ३ ही मुलगी असून अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे व मयताची पत्नी व अर्जदार यांची आई वत्सला मधुकर मेश्राम ही दिनांक २५/०५/१९९४ रोजी व मयताचा मुलगा व अर्जदार यांचा भाउ प्रसेनजित मधुकर मेश्राम हा अविवाहीत असतांना दिनांक ०३/११/२०२० रोजी मयत झाले असल्यामूळे अर्जदार क्र. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त मयत मधुकर बळीराम मेश्राम यांना अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार क्र. १ आभा यांनी पुढे असे कथन केले आहे की, मयत मधुकर बळीराम मेश्राम हे दिनांक २९/०४/२०१७ रोजी गोंदिया येथे मयत झाले आहेत व अर्जदार क्र. १ ते ३ हेच मयत मधुकर बळीराम मेश्राम यांचे वारस असल्यामूळे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे व त्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

५. प्रस्तुतकामी अर्जदार यांनी त्यांचे तोंडी पूराव्यास पूरक व पुष्टीदायक म्हणून मयत मधुकर बळीराम मेश्राम, मयत वत्सलाबाई मधूकर मेश्राम यांचे मृत्यू प्रमाणपत्रांच्या प्रमाणीत प्रती, अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधारकार्डच्या प्रमाणीत प्रती, मयत मधुकर बळीराम मेश्राम यांचे मतदान ओळखपत्र व रेशन कार्डची प्रमाणीत प्रत, ईत्यादी कागदपत्रे निशानी ४ चे कागदपत्र यादीसोबत अभिलेखावर दाखल केलेली आहेत. त्याचबरोबर दैनिक 'कशिश' वर्तमानपत्रामध्ये जाहीरनामा प्रकाशीत केल्याबाबत सदर वर्तमानपत्राची प्रत निशानी १६ चे कागदपत्र यादीसोबत अभिलेखावर दाखल केलेली असून मयत प्रसेनजित मधूकर मेश्राम याचे मृत्यू

प्रमाणपत्राची प्रमाणीत प्रत निशानी १८ सोबत अभिलेखावर दाखल केली आहे. वर नमूद केलेप्रमाणे मयतांचे मृत्यु प्रमाणपत्रांचे अवलोकन केले असता मयत मधुकर बळीराम मेश्राम हे दिनांक २९/०४/२०१७ रोजी गोंदिया येथे, मयत वत्सलाबाई मधुकर मेश्राम ही दिनांक २५/०५/१९९४ रोजी नागपूर येथे व मयत प्रसेनजित मधूकर मेश्राम हे दिनांक ०३/११/२०२० रोजी गोंदिया येथे मयत झाल्याचे दिसून येते.

६. प्रस्तुतकामी वर नमूद केलेप्रमाणे अर्जदारांचे मागणीबाबत अर्जदारांशिवाय मयतास इतर दुसरे कोणी वारस आहेत काय, हे पाहण्याकरीता दि. ०५/०१/२०२३ रोजीच्या दैनिक 'कशिश' या वर्तमानपत्रात जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला होता, मात्र सदर जाहीरनामा प्रकाशीत होउनही अद्यापपावेतो कोणीही सदर प्रकरणात हजर राहून सदर वारस प्रमाणपत्रास हरकत घेतली नाही, त्याचबरोबर सदर प्रकरणात हजर होउन अर्जदार यांचे कथन नाकारलेले नाही अगर अर्जदार यांचेतर्फे दाखल साक्षीपूरावा खोडून काढलेला नाही. त्यामूळे अर्जदारांचे कथन व अर्जदारांचे वतीने अभिलेखावर दाखल पूरावा अबाधित राहिला आहे. सबब, अभिलेखावरील उपलब्ध पूराव्यांचा विचार केला असता, उपलब्ध पूराव्यांवरून मयत मधुकर बळीराम मेश्राम यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस असल्याचे अर्जदारांनी सकृतदर्शनी शाबीत केलेले आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ ला होकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ साठी :</u>**

७. मी यापूर्वीच मुद्दा क्र. १ ला होकारार्थी उत्तर दिलेले असल्याने मुद्दा क्र. २ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

**किरकोळ दि. अर्ज क्र. १७०/२०२२**
आभा व ईतर विरूध्द निरंक
CNR No. MHGO020011492022
निशानी क्र. १ खाली

२. अर्जदार क्र. १ ते ३ यांचेकडून आवश्यक ते न्यायालयीन शुल्क आकारून/स्वीकारून मयत मधुकर बळीराम मेश्राम यांचे अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जाचा खर्च अर्जदारांवर राहील.

स्वा/—

(वि. आ. अवघडे)
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गोंदिया.

दिनांक : १२/०४/२०२३
गोंदिया.